# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### मुंबईतील सागरी सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(१) १६४४ (१८-०३-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ४८२०२ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर सागरी सुरक्षेबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी माजी केंद्रीय गृह सचिव श्री.राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती व सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला असून त्यात महत्त्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवाल केव्हा प्राप्त झाला आहे, त्यातील शिफारशींचे स्वरुप काय आहे, यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (३०-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) श्री.राम प्रधान समितीने आपला अहवाल दिनांक २७/०५/२००९ रोजी शासनास सादर केला. या अहवालातील शिफारशीपैकी सागरी सुरक्षेशी संबंधित शिफारशी संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १८ फेब्रुवारी, २०१० अन्वये सागरी किनारा सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी तटरक्षक दलाकडून तयार करण्यात आलेले (Standard operating Procedures) मध्ये नमूद केल्यानुसार सागरी सुरक्षेसाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

राज्यातील समुद्रकिनारा लगतच्या गावांमध्ये सागरी सुरक्षेकरीता एकूण ५०६ सागर रक्षक दलांची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये एकूण ५९७० रक्षक कार्यरत आहेत.

कृषी व पदूम विभाग, शासन निर्णय दिनांक ३०/०७/२०१५ अन्वये मत्स्यव्यवसाय विभागामार्फत संवेदनशिल लँडींग पॉईट्सवर फिशीग वॉर्डन्सची नेमणूक करण्यात आलेली असून सदर लँडींग पॉईट्सवर मासेमारी बोटींसाठी टोकन सिस्टिम सुरु करण्यात आलेली आहे.

तटीय सुरक्षेकरीता राज्य शासनाने अतिवेगवान बोटी वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्याकरीता बोटी भाड्याने घेण्यात आलेल्या आहेत. पोलीस जवानांना प्रशिक्षण देण्यात आले असून, सुरक्षा पोलीस स्थानके सुरु करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) ३२८७ (२९-०५-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.जयंत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोविड-१९ वायरसच्या प्रादुर्भावामुळे लॉकडॉनच्या काळात अत्यावश्यक सेवा देण्याकरीता नेमण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांपैकी ५५ वर्षावरील पोलिसांना बंदोबस्तासाठी जाण्यास बंदी घातली असल्यामुळे अपुऱ्या

पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांमुळे पोलिसांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यातील पोलीस विभागातील सहायक पोलीस उपनिरीक्षक २० पदे, पोलीस हवालदार ३३ पदे, पोलीस नाईक १६ पदे व पोलीस कॉन्स्टेबल ५६ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला जिल्ह्यासह राज्यातील पोलीस विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०९-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०७/०५/२०२१ नुसार घेतलेल्या निर्णयानुसार पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु असून शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २१/०१/२०२१ अन्वये पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांच्या गैरवर्तनाबाबत

**(३) ३३९८ (२९-०५-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील आडोळी ग्रामपंचायतीच्या तंटामुक्ती अध्यक्ष पदाकरीता दिनांक २१ ऑक्टोंबर, २०१९ रोजी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये मतदान गुप्त व शांत पध्दतीने सुरू असताना वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या सहा.पोलीस निरीक्षक योगीता भारद्वाज यांनी अचानकपणे येवून निवडणूक महत्वाची नाही असे सांगुन गुप्त मतदान थांबविले व ही निवडणुक आवाजी पध्दतीने किंवा उमेदवाराच्या पाठीमागे उभे राहुन मतदान करावे अशा सूचना गावातील ५०० ते ६०० नागरिकांसमोर दिल्या तसेच प्रत्यक्ष व्हिडीओ रेकॉर्डींग सुरु असताना गोंधळ घातला असून

सदर सहा.पोलीस अधिकाऱ्यांनी निवडणूक आचारसंहितेंचा भंग करणे, पदाचा दुरुपयोग करणे, दाबदडपशाही करणे अशा गंभीर स्वरुपाचे वर्तन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी लाखाळा (वाशिम) भागात राहणाऱ्या कु.वैष्णवी विजय जाधव या मुलीचे अपहरण प्रकरण व त्याच दरम्यान पंचशिलनगर, वाशिम येथे टिल्ल्या नामक युवकाचा खुन झाल्याचे प्रकरण या दोन्ही प्रकरणाचा तपास सत्र पोलीस निरीक्षक या महिला अधिकाऱ्यांवर सोपविला होता, उक्त सत्र पोलीस निरीक्षक अधिकाऱ्यांनी सदर प्रकरणाची कोणतीही तपासणी केली नसून त्यांचेवर गैरव्यवहाराला प्रोत्साहन देणे, राजकीय कामात हस्तक्षेप करणे याबाबतचे आरोप करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेजबाबदार, गैरवर्तन करणाऱ्या दोषी सहा.पोलीस अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (३०-११-२०२१) :** (१) उप विभागीय पोलीस अधिकारी, वाशिम यांनी केलेल्या तपासानुसार संबंधित सहायक पोलीस निरीक्षक यांनी निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केल्याचे दिसून आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर शहरात स्वस्त धान्य दुकानाच्या तांदुळाचा गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(४) ३६६९ (०२-०६-२०२०) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहरात अवैधरित्या घेवून जात असलेला स्वस्त धान्य दुकानाचा तांदूळ पंढरपूर पोलिसांनी माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पकडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पंढरपूर तहसिलदार व पुरवठा विभाग यांनी कोणताही खुलासा पोलिसांकडे दिला नसल्याने तांदूळ पोलीस स्टेशनमध्ये तसाच पडून खराब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी गैरव्यवहार झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तांदुळाचा होत असलेला गैरव्यवहार रोखण्यासंदर्भात कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०८-१२-२०२१) :** (१) दिनांक १०/०१/२०२० रोजी पंढरपूर शहरात पोलिसांनी ५० किलो वजनाचा १ या प्रमाणे ५० कट्टे तांदूळ छोटा हत्ती वाहनातून घेऊन जाताना पकडला. तथापि, तपासणी दरम्यान सदर तांदुळ सार्वजनिक वितरण प्रणालीचा असल्याचे आढळून आले नाही.

(२) सदर प्रकरणी पुरवठा निरीक्षक, पंढरपूर यांनी दिनांक १४/०१/२०२० व दिनांक ५/०६/२०२० च्या पत्रान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर यांच्याकडे खुलासा सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला तांदुळ पोलीस स्टेशनमध्ये पडून आहे. तथापि, तपासादरम्यान सदर तांदुळ सार्वजनिक वितरण प्रणालीचा नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ६(अ) नुसार जीवनावश्यक वस्तुंचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करुन जप्त तांदळाची विल्हेवाट लावण्यासंबंधी प्रस्ताव सादर करावा. असे तहसिलदार पंढरपूर यांनी दिनांक १९/११/२०२० च्या पत्रान्वये वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर यांना कळविले आहे.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कळंबणी बु. (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील शासकीय रुग्णालयात डायलेसिस सेंटर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) ४२८१ (१७-०७-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबणी बु. (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील १०० खाटांच्या शासकीय रुग्णालयात डायलेसिस सेंटरची उपलब्धता नसल्यामुळे खेड, दापोली, मंडणगड, चिपळूण व पोलादपुर या तालुक्यातील रुग्णांना १०० ते १५० कि.मी. प्रवास करुन इतर खाजगी रुग्णालयातून खर्चिक उपचार करावा लागत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळंबणी बु. येथील शासकीय रुग्णालयात डायलेसिस सेंटर उपलब्ध करुन देणेबाबत मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कळंबणी बु. येथील शासकीय रुग्णालयात डायलेसिस सेंटर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१), (२) व (३) उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी जिल्हा रत्नागिरी येथे १०० खाटांचे प्रमाणकानुसार आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी जिल्हा रत्नागिरी येथे डायलेसिसची सुविधा उपलब्ध नाही. तथापि, दिनांक २५ ऑक्टोंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये उपजिल्हा रुग्णालय, कळंबणी जिल्हा रत्नागिरी येथे

डायलेसिस सेंटर स्थापन करण्याकरीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्याबाबत हाफकीन जीव औषध महामंडळास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात लॉकडाऊनच्या काळात ग्रामविकास विभागाने निविदा काढल्याबाबत

**(६) ४३२८ (१७-०७-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३०९० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व उद्योग लॉकडाऊनमुळे दीड महिन्यापासून बंद असून राज्याची आर्थिक स्थिती बिकट असताना ग्रामविकास विभागाने मनुष्यबळासाठी सुमारे ३ हजार ५०० कोटी रुपयांची निविदा काढल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सेस आणि जीएसटी वसुली तसेच इतर कामांसाठी २८ हजार सेवा करसेवा प्रदात्यांची कंत्राटी पध्दतीने भरती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लॉकडाऊनमुळे अनिश्चिततेचे वातावरण असताना संबंधित विभागाकडून हजारो कोटी रुपयांची निविदा काढण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-११-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे.

सदर निविदा ही २ भागांत काढण्यात आली होती. पहिल्या भागात ग्रामपंचायतींना online returns भरण्याकरीता वाजवी दरात एजन्सी निश्चित करून देण्यात येणार होते तर दुसऱ्या भागात ग्रामविकास विभागाच्या अखत्यारित विविध आस्थापनांना त्यांच्या स्वनिधी मधून मनुष्यबळाची आवश्यक्ता भासल्यास त्यासाठी एजन्सीची निवड करून देण्यात येणार होती. मात्र निविदा ३ हजार ५०० कोटी रूपयांची असल्याची बाब खरी नाही. २८ हजार भरतीची माहिती खरी नाही.

(३) व (४) सुरूवातीला केंद्र शासनाने २१ दिवसांचा लॉकडाऊन घोषित केला होता.लॉकडाऊनमध्ये पुढे वाढ होणार नाही हे गृहित धरून सदर निविदा काढण्यात आली होती. मात्र करोना विषाणू चा प्रादुर्भाव वाढून परिस्थिती गंभीर झाल्यामुळे तसेच शासनाने देखिल वेळोवळी लॉकडाऊनमध्ये वाढ केल्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सध्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माध्यमिक शिक्षणाधिकारी पदावर पुनर्स्थापना केल्याबाबत

**(७) ४३९८ (०८-०९-२०२०) श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाधिकारी नाशिक पद रिक्त असल्याकारणाने प्रभारी शिक्षणाधिकारी म्हणुन श्री प्रवीण पाटील यांना पदभार दिला असून श्री पाटील धुळे येथे कार्यरत असताना त्यांना "लाच" घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी गुन्हा दाखल करून अटक केली होती व त्यांना निलंबित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निलंबित अधिकाऱ्यास पुनर्स्थापना देताना अकार्यकारी पदावर नियुक्ती दिली जाते असा शासन आदेश असताना श्री.पाटील यांच्याकडे माध्यमिक शिक्षणाधिकारी पदभार देण्याचे कारण काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (११-११-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नाशिक या पदावरील कार्यरत श्री.बच्छाव यांना शासन आदेश दिनांक १४ मार्च, २०२० अन्वये निलंबित करण्यात आल्याने प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने श्री.प्रविण पाटील, शिक्षणाधिकारी (निरंतर), जि.प. नाशिक यांना त्यांचेकडील कार्यभार सांभाळून सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १८/०३/२०२० ते दिनांक १०/०८/२०२० या कालावधीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक यांच्या दिनांक १७/०३/२०२० च्या आदेशान्वये सुपुर्द करण्यात आला होता.यास्तव सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजीव गांधी योजनेंतर्गत अपघाती मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम देण्याबाबत

**(८) ४७७१ (०९-०९-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये ग्रामीण भागात प्राथमिक शाळांमधील अपघाती मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना राजीव गांधी योजनेंतर्गत जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडुन मिळणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम अद्याप देण्यात आली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२० च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१९-२०२१ करीता दिनांक ०४/०१/२०२० रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने समिती सभेमध्ये आठ लाभार्थ्यांची यादी, मंजूर प्रस्तावानुसार शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवली असून सदर यादीतील अनुदानास पात्र विद्यार्थ्यांना एकूण रुपये ६,००,०००/- इतका निधी उपलब्ध करुन द्यावा अशी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १६/१२/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ३.६० कोटी इतका निधी सदर योजनेंतर्गत वितरीत करण्यात आला आहे. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी अकोला जिल्ह्यासाठी त्यांच्या मागणीनुसार रुपये ६.०० लक्ष इतकी तरतूद वितरीत केली होती. त्यापैकी सदर योजनेकरीता रुपये ५.२५ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला असून उर्वरित रुपये ७५ हजार इतकी रक्कम शासनास समर्पित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विभागाच्या पर्यवेक्षिय यंत्रणेतील पदे रिक्त असल्याबाबत

**(९) ४७९१ (०८-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नागपूर विभागाच्या पर्यवेक्षिय यंत्रणेतील शिक्षण उपसंचालक, बोर्डाचे अध्यक्ष प्रभारी असून, केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी आदी अनेक पदे रिक्त असल्याचे माहे जुलै, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण उपसंचालक कार्यालयात सहाही जिल्ह्यातील खाजगी अनुदानित स्वयं अर्थसहाय्यित जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळांचा आढावा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती घेण्याचे काम असते परंतु पर्यवेक्षिय यंत्रणेकडून सदर विभागातील माहिती वेळत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी नवनवीन उपक्रम राबविण्याच्या घोषणा शासनाकडून होत असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणारी पर्यवेक्षक यंत्रणा प्रभारी अधिकाऱ्यांवर अवलंबून असल्याने योग्यती अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऑनलाईन शिक्षण पध्दतीसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) ५०२५ (१२-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनामुळे मुलांना शाळेत पाठवणे शक्य नसून शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून राज्यात ऑनलाईन शिक्षण पध्दतीचा वापर होत असल्याने अनेक भागात ऑनलाईन शिक्षण पध्दती घेण्याच्या सोयीसुविधा उपलब्ध नसल्यामुळे नैराश्यात येऊन अनेक विद्‌यार्थी आत्महत्या करीत असल्याचे प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन शिक्षणासाठी मोबाईल, रोजगार तसेच मोबाईल घेण्याची परिस्थिती नसल्यामुळे एका वडील नसलेल्या कराड (जि.सातारा) तालुक्यातील दहावीत शिकणाऱ्या विद्‌यार्थ्यीनीने आत्महत्या केल्याचे माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ऑनलाईन शिक्षण पध्दतीसाठी सोयीसुविधा उपलब्ध न झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या रोखण्याबाबत तसेच ऑनलाईन शिक्षण पध्दतीमध्ये नेटवर्क समस्या, विजेच्या समस्या अशा प्रकारच्या अडचणी सोडविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सदर विद्यार्थीनी तिच्याकडे स्मार्टफोन नसल्यामुळे मैत्रिणीच्या मोबाईलवर ऑनलाईन शिक्षण घेत होती. याशिवाय कोविड-१९ मुळे राज्यातील शाळा बंद असल्या तरी ज्या विद्यार्थी / पालकांकडे सुविधा आहेत त्यांच्यासाठी ऑनलाईन शिक्षण सुरु रहावे यासाठी विविध उपक्रम सुरु केले आहेत. तसेच ज्यांना ऑनलाईन शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध नाही तेथे गावातील सुशिक्षित तरुण, सरपंच, पोलीस पाटील, शिकलेल्या माता, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य "शिक्षक मित्र" बनून मुलांच्या शिक्षणासाठी विविध प्रकारे सहकार्य करीत आहेत. या पध्दतीने कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रात्र शाळेबाबतचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(११) ५१३२ (१३-१२-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रात्रशाळेतील शिक्षकांच्या नोकऱ्या दिनांक १७ मे, २०१७ च्या शासन निर्णयानुसार समाप्त झाल्याने गरीब व गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर बाब तपासण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाणार रिफायनरी प्रकल्पात (जि.रत्नागिरी) शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या जमीन व्यवहारांची चौकशी करण्याबाबत

**(१२) ५३५८ (२३-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६२५ ला दिनांक २८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील रद्द झालेल्या नाणार तेलशुध्दीकरण प्रकल्पाच्या वेळी झालेले जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार संशायस्पद असल्याने याप्रकरणी कोकण रिफायनरी प्रकल्पविरोधी संघर्ष समितीने तक्रार करुन चौकशी करण्याची मागणी केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकल्पाची अधिसुचना निघण्याआधी परप्रांतिय व्यापारांनी कवडीमोल भावाने शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०३-१२-२०२१) :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्हयातील रद्द झालेल्या नाणार तेलशुध्दीकरण प्रकल्पाच्या वेळी झालेले जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार संशयास्पद असल्याने चौकशी करण्याबाबतची तक्रार कोकण रिफायनरी प्रकल्पविरोधी संघर्ष समितीने दाखल केली आहे. सदर चौकशी करीता अपर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव, तौक्ते चक्रीवादळ, पूरपरिस्थिती या नैसर्गिक आपत्तीच्या कारणांमुळे चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेल्हारा नाफेड केंद्रावर (जि.अकोला) हरभरा व धानमाल खरेदी सलग २० दिवस प्रलंबित राहिल्याने शेतकऱ्यांना दयावे लागलेले अतिरिक्त वाहनभाडे मिळणेबाबत

**(१३) ५६१७ (१३-११-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांचा धान्याचा माल व हरभरा इत्यादी नाफेडमार्फत खरेदी करण्याबाबत सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता शासनामार्फत खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली होती, त्यानुसार तेल्हारा नाफेड केंद्रावर (जि.अकोला) २५२ शेतकऱ्यांनी भाड्याने खाजगी वाहने करुन आपला धान्याचा माल, हरभरा इ. खरेदी केंद्रावर नेत असताना जवळपास २० दिवस खरेदी प्रलंबित राहिल्याने शेतकऱ्यांना भाड्यांना आणलेली वाहने उभी करावी लागुन त्याचे भाडे अदा करावे लागल्याचे दिनांक २५ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भाड्याने घेतलेल्या खाजगी वाहनांचा आर्थिक बोजा शेतकऱ्यांवर नाहक पडल्यामुळे या संबंधित २५२ शेतकऱ्यांनी त्याची पुर्तता म्हणून प्रति वाहन रुपये १०००/- मिळावेत अशी शासनाकडे माहे ऑगस्ट, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील मा.सहकार व पणन मंत्री यांचेकडे दिनांक १२ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित २५२ शेतकऱ्यांना वाहन भाड्यापोटी सोसावा लागलेल्या आर्थिक भुर्दंडांची प्रतिपुर्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. हंगाम २०२०-२१ मध्ये हमी भावाने हरभरा(चना) खरेदीची अंतिम मुदत दिनांक १३/०६/२०२० पर्यंत होती.सदर खरेदी NeML पोर्टल च्या माध्यमातून ऑनलाईन केली जाते. तथापि, कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे देशात व राज्यात लागू केलेल्या लॉकडाऊन मुळे हरभरा(चना) खरेदीची मुदत दिनांक १५/०७/२०२० पर्यंत वाढविण्यात आली होती. तेल्हारा जि.अकोला येथे दिनांक १४ व १५ जुलै, २०२० रोजी मुसळधार पाऊस झाल्याने तसेच खरेदी केंद्रावर मोठ्या प्रमाणात वाहणे आल्याने खरेदीसाठी आलेल्या वाहनांचे मोजमाप मुदतीत होऊ शकले नाही. दिनांक १५/०७/२०२० रोजी NeML पोर्टल बंद झाल्याने सदर पोर्टल दिनांक २६/०७/२०२० रोजी सुरु केल्यानंतर सर्व वाहनांचे मोजमाप पूर्ण करुन खरेदी केलेला हरभरा(चना) गोदामात जमा करून शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत.

(२) नाही.

(३) होय.

(४) नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करण्याची जबाबदारी सब एजंट संस्थेची असल्याने, निवेदनांवर पुढील कार्यवाही करण्यास तेल्हारा खरेदी विक्री संघास दिनांक ०२/१०/२०२० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) तालुक्यातील ट्रामा केअर सेंटरमध्ये अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(१४) ५८२१ (१७-११-२०२०) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा (जि.जालना) तालुक्यातील ट्रामा केअर सेंटरमध्ये अनेक पदे रिक्त असल्यामुळे स्थानिक रुग्णांना उपचार मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ट्रामा केअर सेंटरमधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली असून वर्ग-३ व वर्ग-४ चे रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही चालु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मातोश्री अनुसया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोनखेड (ता.लोहा, जि.नांदेड) शाळेत झालेल्या अपहाराबाबत

**(१५) ६०२५ (०१-१२-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसया सेवाभावी संस्था, कंधारद्वारा संचलित मातोश्री अनुसया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोनखेड, (ता.लोहा. जि.नांदेड) शाळेच्या संस्थेने शिफारस केलेल्या मुख्याध्यापकास मान्यता न देण्याचे कारण काय,
(२) असल्यास, निलंबित व सेवासमाप्त केलेल्या शिक्षकांच्या नावाने प्रशासकीय अधिकार प्रदान करून तसेच शाळेच्या बाहेर परस्पर देयके तयार करुन शासनाची कोट्यवधी रुपयाची फसवणूक करणाऱ्या सहा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सेवासमाप्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे शाळा न्यायाधिकरण, लातूर येथे अपिल दाखल असून न्यायाधिकरणाने सेवा समाप्ती आदेशास स्थगिती दिली नसल्याने तसेच अपहाराच्या चौकशीचे आदेश दिले असताना चौकशी अहवालावर शिक्षण आयुक्त यांनी सुनावणी घेऊन तक्रारदारास अंतिम निर्णय १२ आठवड्याच्या आत कळविणे गरजेचे असताना तशी कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपहाराची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, संस्थेने शिफारस केलेल्या सेवाजेष्ठ शिक्षकास मुख्याध्यापकाची मान्यता किती दिवसात प्रदान करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) शाळेची सेवा ज्येष्ठता विचारात घेऊन संस्थेने शिफारस केलेल्या मुख्याध्यापक मान्यतेचा प्रस्ताव अमान्य केला आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशी समिती गठित करण्यात आली असून चौकशी समितीने आपला अहवाल विभागीय शिक्षण संचालक, लातूर यांना सादर केला आहे.
(३) व (४) चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालावर विभागीय शिक्षण संचालक, लातूर यांच्या मार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. तथापी, सद्य:स्थितीमध्ये प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ३१११/२०२० दाखल करण्यात आलेली आहे व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या वन विभागाच्या गस्ती पथकावर प्राणघातक हल्ला झाल्याबाबत

**(१६) ६१३४ (२०-११-२०२०) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या तोतलाडोह जलाशयात अवैध मासेमारीच्या टोळीने वन विभागाच्या गस्ती पथकावर प्राणघातक हल्ला करून डायनामाईटने दार फोडण्याचा, गस्ती बोट जाळून टाकण्याचा तसेच शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी देवलापार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठिकाणी ३०-४० बोटीमधून आलेल्या ६० ते ७० अवैध मासेमारी करणाऱ्या टोळीतील गुंडाची संरक्षण कुटीच्या बाजूने लावण्यात आलेल्या छुप्या कॅमेरामध्ये छायाचित्रे आलेली असतानाही गुन्हेगारांना अटक करण्यास यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुन्हेगारांना अटक करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०९-१२-२०२१) :** (१) पेंच नदीवर असलेल्या तोतलाडोह डॅम येथील जलाशयात अवैध मासेमारी करीता विशेष व्याघ्र संरक्षण दलाचे कर्मचारी हे पेट्रोलींग करुन पथक हे तुमडीमट्टा संरक्षण कुटीवर जेवणाकरीता आले. या संधीचा फायदा घेवून १५ ते २० बोटी या कुटीच्या सभोवताली येवून त्यातील २५ ते ३० इसमांनी तुमडीमट्टा कुटीवर दगडफेक करुन हल्ला केला तसेच सदर गस्ती पथक कुटीमध्ये हजर असताना मासेमार ईसमांनी कुटीची पथराची भिंत व लोखंडी दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला व काही ईसम पत्रावरुन चढुन आत प्रवेश करुन ईमारतीचा मुख्य दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करुन सदर पथकावर जोरदार हल्ला करण्याचा तयारीत असताना या पथकातील वननिरीक्षक जी.ओ. राउत यांनी स्वत:च्या व सहकार्याच्या जीवीतांचे संरक्षण करीता आपल्या जवळील १२ बोर शस्त्रामधून सदर कुटीच्या दरवाज्याच्या खालुन दोन राऊंड फायर केले असता अवैध मासेमार ईसम हे घटनास्थळावरुन पळुन जातांना गस्तीपथकाची बोट जाळुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करुन गैरकायदयाची मंडळी जमा करुन सदर शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करुन शिवीगाळ व धमकी देवून शासकीय कामामध्ये अडथडा निर्माण केला.
(२) वनविभाग कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्र नुसार वन विभागाच्या संरक्षण कुटीच्या बाजूने कोठेही छुपा कॅमेरा किंवा सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आलेला नाही. मुखबीरा मार्फत गोपनीय माहिती काढुन अज्ञात आरोपी यांचा शोध सुरु आहे.

(३) या प्रकरणी देवलापार पोलीस स्टेशनला अपराध क्र. २१४/२०२० कलम ३५३, १४३, १४७, ३४२, ४२७, ४५२, १८६, ५०४, ५०६ भादंवि सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी मध्य प्रदेश राज्यातील असण्याची शक्यता असल्याने मध्यप्रदेश राज्यातील वनविभाग व पोलीस विभागाशी संपर्क करुन आरोपींचा शोध घेण्याची कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन भत्ता मिळण्याबाबत

**(१७) ६२०६ (१४-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत लाखांदूर तालुक्यातील (जि.भंडारा) हजारो थकित कर्जदार शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ झाला मात्र कर्जमुक्ती होतानाच शासनाने तीन वर्षापासून नियमित कर्जाची उचल व मुदतीत कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचे आश्वास्त केले असून त्यांना प्रोत्साहन निधी कधी मिळणार असा सवाल शेतकरी उपस्थित करित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३०-११-२०२१) :** (१) होय.
(२) अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या खातेदारांना योग्य समर्पक योजनेद्वारे दिलासा देण्याची बाब तपासण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीचे गठन करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंचायत समिती, नागपूर येथे ग्रामीण पाणीपुरवठा विभागात बोगस प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(१८) ६८९३ (१५-०३-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, नागपूर येथे ग्रामीण पाणीपुरवठा विभागात श्री.गौतम माटे यांची नियुक्ती सीआरटी मदतनीस या पदावर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक ३१ मे, २०१६ रोजीच्या आदेशानुसार त्यांना हातपंप यांत्रिकी या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी दिनांक २९ सप्टेंबर, २००३ रेजीपासून मंजूर केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही वेतनश्रेणी मंजूर करण्यापूर्वी त्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आली होती काय,

(४) असल्यास, श्री.माटे यांनी बोगस प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक केल्याची तक्रार करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने श्री.माटे यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-१२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) होय, चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात करण्यात आलेल्या खुलाश्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी सदर प्रमाणपत्राचे सत्यतेबाबत चौकशी करण्यात आली असून सर्व कागदपत्रे बरोबर असल्याची खात्री केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साईनाथ शिक्षण संस्था, आणि शिवनेर विद्यालय, घाटकोपर शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतरांचे वेतन अदा करण्याबाबत

**(१९) ७०७० (१५-०३-२०२१) श्री.कपिल पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १३ मधील प्रश्न क्रमांक ५०७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साईनाथ शिक्षण संस्था, घाटकोपर आणि शिवनेर विद्यालय, घाटकोपर शाळांवर प्रशासक नेमण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेतील शिक्षक/शिक्षकेतरांचे माहे फेब्रुवारी, २०२० पासूनचे वेतन तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन, ग्रॅज्युएटी अद्यापपर्यंत देण्यात आले नसल्याने सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक/शिक्षकेतरांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०६-१२-२०२१) :** (१), (२) व (३) साईनाथ शिक्षण संस्था संचलित माध्यमिक विद्यालय, घाटकोपर व शिवनेर मित्र मंडळ संचलित शिवनेर विद्यामंदीर हायस्कूल, साकिनाका या शाळेवर प्रशासक नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, संबंधित दोन्ही संस्थांनी प्रशासक नियुक्तीच्या आदेशाविरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल केले आहे. मा.उच्च न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणी स्थगिती दिलेली असल्याने प्रशासकांनी कार्यभार स्वीकारलेला नसून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील तुरुंगातील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) ८४१७ (२१-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह तळोजा, नागपूर, कोल्हापूर व अमरावती या ठिकाणच्या तुरुंगातील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याचे दिनांक १३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना कोरोना संसर्गाची लागण मोठ्या प्रमाणावर होत असल्याने कैद्यांना कोरोनावरील उपचारासाठी वैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तुरुंगातील वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे

महाराष्ट्र कारागृह विभागातील आस्थापनेवर दिनांक १३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास वैद्यकीय अधिकारी यांची १४ पदे रिक्त होती.

(२) या स्वरुपाची मागणी केल्याची पत्रे कार्यालयीन अभिलेख्यावर आढळून आली नाहीत.

(३) वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात कारागृह विभागाकडून आरोग्य विभागास कळविण्यात आल्यानुसार आरोग्य विभागाकडून ९ रिक्त पदांवर वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्त्या करून सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व कारागृहांना दैनिक भेटी देण्याकरीता एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूका

करण्यात आल्या आहेत. कारागृहस्तरावरील वैद्यकीय सेवेशी संलग्न असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची उर्वरित रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील शासकीय जागांवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(२१) ८४१८ (१५-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यात दोन हजारांहून अधिक महसुली, खाडीकिनारीच्या जागा भूमाफियांनी हडप करुन अनधिकृत बांधकामे केली असल्याचे दिनांक १२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय जागांवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) मौजे डोंबिवली, ता.कल्याण येथील स. नं. ६०/१ पै. (जु. स. नं. ११३/१ पै.) व मौजे नांदिवली येथील सर्व्हे नंबर ८ व ९ या शासकीय जमिनीवरील बांधकामे कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पोलीस विभाग व महसूल विभागाच्या संयुक्तिक कारवाईने निष्कासित करण्यात आलेली आहे. काही शासकीय जागेवर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्तींविरुध्द एकूण ५ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. उर्वरीत शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामे तसेच खाडी किनारी असलेल्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याची कार्यवाही संकल्पित आहे.

---

## मौजे शिंपोली (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) येथील कोरा केंद्राला वाटप केलेल्या शासकीय भूखंड शासनजमा करण्याबाबत

**(२२) ८४४२ (१४-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिंपोली (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) येथील स.नं. १९, २०/१ अ व २०/२ हे शासकीय भूखंड मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन (कोरा केंद्र) यांना काही अटी व शर्तीस अधिन राहून प्रदान करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाटप केलेल्या प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर होत नसल्याबाबतच्या प्राप्त तक्रारीवर शासनाने केलेल्या चौकशीत वाटप आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे, संस्थेच्या ताब्यात भूखंड आल्यानंतर ७ एकर जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे, कृषी लागवडीचे मूळ उदिष्ट पूर्ण न केल्याचे, यासारखे अनेक गंभीर आक्षेप चौकशी अहवालात घेण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शर्तभंग प्रकरणी संस्थेकडून जमीन शासन जमा करण्याचे आदेश मा.महसूल मंत्री, विभागीय आयुक्त, कोकण विभाग व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिलेले आहेत तसेच “गणेश नायडू यांच्याविरुध्द कारवाई करुन प्रकरण मा.न्यायालयात असले तरी महाधिवक्ता यांना सांगून ते निकाली काढण्याबाबत पाठपुरावा करु आणि सदरहू जागा ताब्यात घेऊ” असे आश्वासन मा.उप मुख्यमंत्री यांनी विधानपरिषद सभागृहात दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संस्थेकडील भूखंड शासनजमा करण्याचे आश्वासनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन या संस्थेस ज्या प्रयोजन व अटी व शर्तीवर जमीन देण्यात आली त्या अटी व शर्तीचा संस्थेने भंग केला आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २७/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये संस्थेस प्रदान केलेल्या मौजे शिंपोली येथील मिळकतीपैकी ७१२०५.२० चौ.मी. जमीन शासन जमा करुन घेतली आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या उक्त आदेशाविरुध्द संस्थेने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे अपील दाखल केले होते. या अपिल प्रकरणी सुनावणीअंती विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे आदेश कायम केलेले आहेत. तद्नंतर संस्थेने मा.मंत्री (महसूल) यांच्या न्यायालयात दाखल केलेले फेरतपासणी अर्ज दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आले असून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक २७/१२/२०१७ रोजीचे आदेश कायम केले आहेत.

मा.मंत्री (महसूल) यांच्या दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या आदेशानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई उपनगर यांनी मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन या संस्थेस प्रदान केलेल्या जमिनीच्या मिळकत पत्रिकेतील धारक सदरी असलेले संस्थेचे नाव कमी करुन “महाराष्ट्र शासन” अशी नोंद घेतीली आहे. तसेच सत्ताप्रकारातील शेती या धारणाधिकारा ऐवजी “ग” असा धारणाधिकार नमूद करण्यात आला आहे.

सदरच्या कार्यवाही विरुध्द मुंबई सबर्बन डिस्ट्रीक्ट व्हिलेज इंडस्ट्रिज असोसिएशन (कोरा कैंद्र) यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक १४५२३/२०१८ दाखल केली असून, सदर प्रकरण मा.मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०८/११/२०१९ रोजीच्या आदेशान्वये याचिका कर्ता यांच्यावर कोणतीही सक्तीची कार्यवाही करु नये, असे आदशित केले आहे. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती उठवून शासनाची बाजू भक्कमपणे मांडण्याकामी पुढील योग्यती कार्यवाही करण्याबाबत व अंतिम निकाल

शासनाच्या बाजून लागण्याबाबत दक्षता घेण्यात यावी, अशी विनंती जिल्हाधिकारी, मुंबई उपगनगर यांनी दिनांक २९/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये सरकारी अभियोक्ता, मुंबई उच्च न्यायालय यांना केली आहे.

त्याचप्रमाणे सदर न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या वतीने बाजू मांडण्याची विनंती मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांना करण्यात आली आहे.

---

## मुंबईचे माजी पोलीस आयुक्तांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(२३) ८५०८ (१४-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईचे माजी पोलीस आयुक्त, परमबीर सिंह यांनी हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारींनुसार व यासंदर्भात गुन्हे दाखल झाल्याप्रकरणी शासनाने चौकशी आदेश दिल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-११-२०२१) :** (१), व (२) होय.

अर्जदार श्री.अनुप डांगे, तत्कालीन पोलीस निरीक्षक गावदेवी पोलीस ठाणे, मुंबई यांनी श्री.परमबीर सिंह, तत्कालीन पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याविरुध्द दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२१ रोजी शासनास दिलेल्या तक्रार अर्जामधील भ्रष्टाचाराशी संबंधित मुद्यांच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी करण्याबाबत दिनांक १२ जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून उघड चौकशी सुरू आहे.

तसेच अर्जदार श्री.भिमराव रोहिदास घाडगे, पोलीस निरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, अकोला यांनी श्री.परमबीर सिंह, तत्कालीन पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जामधील भ्रष्टाचाराशी संबंधित मुद्यांच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी करण्याबाबत दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून उघड चौकशी सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोलशेत, ठाणे येथे महाराष्ट्र दुग्ध उत्पादक सहकारी मंडळास देण्यात आलेल्या जागेचा मंडळाच्या संचालकाने गैरवापर केल्याबाबत

**(२४) ८५२३ (१५-०७-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलशेत, ठाणे येथील सर्व्हे क्रमांक २९१/१ मधील २.६४ हेक्टर आर एवढे क्षेत्र गुरांचा तबेला आणि दुग्ध उत्पादनासाठी माहे डिसेंबर, १९९३ मध्ये महाराष्ट्र दुग्ध उत्पादक सहकारी मंडळास देण्यात आली, सदर जागा देताना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी घालून दिलेल्या अटी-शर्तींचे उल्लंघन करुन मंडळाने सदर जागेवर अनधिकृत बांधकामे उभारली असून तेथे गोडाऊन, दुकाने, शोरुम, गॅरेज आणि सर्व्हिस सेंटर आदींसाठी या जागेचा वापर केला गेला, दूध उत्पादन क्षेत्रात अनेकांना रोजगार उपलब्ध व्हावा या हेतूने दिलेल्या जागेचा मंडळाच्या संचालकांनी गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूध उत्पादक सहकारी मंडळाकडून सदरहू जागा शासन जमा करून, पुन्हा या जागेवर अतिक्रमण होऊ नये याकरीता तहसिलदार, ठाणे यांनी नियोजन विभागाकडून निधी प्राप्त करुन संरक्षक भिंत बांधावी असे आदेश प्रांताधिकारी, ठाणे यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय जमिनीचा गैरवापर करणाऱ्या महाराष्ट्र दुग्ध उत्पादक सहकारी मंडळाच्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करुन सदर जमीन शासन जमा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०८-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र दुग्ध उत्पादक सहकारी मंडळ मर्यादीत, संस्था यांना प्रदान केलेल्या मौजे कोलशेत, ता.जि.ठाणे येथील स. नं. २९१/१ क्षेत्र २-६४-० हे.आर या जमिनीसंदर्भात सदरहू संस्थेने अटी व शर्तींचा भंग केल्यामुळे प्रस्तुत जमीन शासन जमा करण्यात येत असल्याचे आदेश उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी दिनांक १२/०४/२०२१ रोजी पारीत केले आहेत. सदरहू संस्थेने उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्या दिनांक १२/०४/२०२१ रोजीच्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २४७ अन्वये अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे अपिल दाखल केले असून त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यातील नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(२५) ८५४५ (१८-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.चंदूभाई पटेल, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत वा राज्यातील नियमित कर्ज फेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच दोन लाखापर्यंत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा शासनाने केली असून दिनांक ३० जून, २०२० पर्यंत कर्ज भरण्याची मुदत देण्यात आली असतानाही शासनाकडून प्रोत्साहनपर रक्कम मिळावी या हेतूने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी बँका व सेवा संस्थांचे पीक कर्ज विहित मुदतीत अदा करुन देखील अद्यापही शेतकऱ्यांना प्रोत्साहन रक्कम मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जमाफी घोषित करताना वन टाईम सेटलमेंट आणि प्रोत्साहन रक्कम देण्याबाबतच्या घोषणेस १ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही कोणताही शासन निर्णय न झाल्यामुळे राज्यातील बहुतांश जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २० हजार शेतकरी प्रोत्साहन योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत राज्यातील अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लाभार्थी शेतकऱ्यांना विनाविलंब प्रोत्साहन योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३०-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढून चिंतामुक्त करण्याच्या हेतूने मा.मुख्यमंत्री महोदय यांनी हिवाळी अधिवेशन, २०१९ मध्ये “महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९” जाहीर केली आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय दिनांक २७/१२/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला. या योजनेंतर्गत दिनांक १/०४/२०१५ ते दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत वाटप केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे, पुनर्गठन / फेरपुनर्गठन करुन मध्यम मुदत कर्जात रुपांतर केलेल्या एक किंवा एकापेक्षा जास्त ज्या कर्ज खात्यात दिनांक ३०/०९/२०१९ रोजी मुद्दल व व्याजासह थकीत असलेल्या व परतफेड

न झालेल्या हप्त्याची रक्कम रुपये २.०० लाखापर्यंतची रक्कम विचारात घेण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत आतापर्यंत राज्यातील ३१.४१ लाख खातेदारांना रुपये २०,०५९ कोटी रकमेचा लाभ देण्यात आलेला असून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ९८२१ खातेदारांना ४१.३४ कोटीचा लाभ देण्यात आला आहे.

तसेच अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या खातेदारांना योग्य समर्पक योजनेद्वारे दिलासा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत योजनेनुसार मच्छीमारांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) ८६१२ (१७-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय, मत्स्य विभाग ११२०/प्र.क्र.१३३/पदुम-१४, दिनांक ३१ मार्च, २०२१ नुसार मासेमारी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत मच्छीमारांना यांत्रिकी नौका बांधणीसाठी राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत योजनेखाली आर्थिक सहाय्य देण्याची योजना राबविण्यात आली असून, या योजनेनुसार मच्छीमारांना २५ टक्के आणि ५५ टक्के अशा दोन टप्प्यामध्ये निधी उपलब्ध करुन दिला, त्यानुसार शासनामार्फत वितरित करण्यात येणारे ५५ टक्के अर्थसहाय्य वरील शासन निर्णयानुसार संस्थांना वितरित करण्याचा निर्णय झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागामार्फत अद्यापही कोणत्याही प्रकारची रक्कम काही संस्थांच्या खात्यामध्ये जमा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी वर्ग करणेबाबतची विनंती व्यवस्थापक, हरेश्वर मच्छीमार सहकारी संस्था, दापोली यांनी मा.सहकार मंत्री यांना दिनांक १३ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छीमारांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०७-१२-२०२१)** : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

कार्यालयाची संगणकीय आंतरजाल सेवा खंडित झाल्यामुळे निधी संस्थांना अदा करणे शक्य झाले नाही.
(३) या विभागाकडे असा पत्रव्यवहार उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) ८७०४ (२१-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ६८६६ ला दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीत झालेल्या गैरव्यवहाराची विशेष अधिकारी नेमून ॲक्शन टेकन रिपोर्ट घेण्यात यावा, अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.कृषी मंत्री यांना ई-मेल संदेशाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदेशीर व चुकीचे निर्णय घेवून नोकर भरतीत करण्यात आलेला गैरव्यवहार, इतर गैरप्रकारांची तसेच चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यासाठी विशेष अधिकारी नेमणूक करुन त्याचा ॲक्शन टेकन रिपोर्ट घेण्यात यावा या मागणी प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्यास्तरावर समिती गठीत करून अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आले होते, सदर अहवाल प्राप्त झालेला असून त्यावर शासनस्तरावर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, याबाबतची थोडक्यात व सविस्तर माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीत गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या स्तरावर समिती गठीत करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तरी सदर अहवाल प्राप्त झाला असून त्यावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने जुने व प्राचिन किल्ले संवर्धन करण्याच्या योजनेबाबत

**(२८) ९०५६ (१५-०७-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने जुने व प्राचिन किल्ले संवर्धन करण्याच्या योजनेची घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये अकोला-वाशिम-बुलढाणा येथील प्राचीन व शिवकालीन किल्ले यांचे संवर्धन करण्याबाबत निधीचे नियोजन करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेमध्ये अकोला येथील प्राचीन व शिवकालीन असदगड किल्लाचे पुनरुत्थान करण्याकरीता शासनाने निधी देण्याबाबत नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अकोला-वाशिम-बुलढाणा येथील प्राचीन व शिवकालीन किल्ले यांचे संवर्धन करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०८-१२-२०२१) :** (१) होय.

(२) नाही. या योजनेतर्गत पहिल्या टप्प्यात ६ किल्ल्यांचे जतन व संवर्धन हाती घेण्यात आले आहे.

(३) होय, असदगड किल्ला, जि.अकोला हे स्मारक भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडळ यांच्या अंतर्गत असलेले राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. सदर स्मारकाच्या जतन व संवर्धनाकरीता आवश्यक कार्यवाही करण्याबाबत मा.पालकमंत्री, जि.अकोला यांनी मागणी केली आहे.

(४) अकोला जिल्हयातील नरनाळा किल्ला व असदगड किल्ला या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय स्मारकाचे जतन व संवर्धन होण्याकरीता एकूण ३०.१ कोटी इतक्या रकमेचा निधी जिल्हाधिकारी, अकोला यांनी नरनाळा विकास प्रकल्प अंतर्गत मंजूर केल्याचे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडळ यांनी कळविले आहे. मंजूर केलेल्या रकमेपैकी रुपये २२.३५ कोटी नरनाळा किल्ला व रुपये ७.७५ कोटी असदगड किल्ला या स्मारकाकरीता मंजूर करण्यात आले आहेत.

सदरहू स्मारकाचे काम महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे उपलब्ध निधीतून सिव्हिल डिपॉझिट योजनेद्वारे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडळ यांच्याकडून जतन व संवर्धन प्रकल्प राबविण्याबाबत महानिदेशक, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नवी दिल्ली यांनी परवानगी दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील क्षेत्रिय परिवहन कार्यालयात परवान्याचे नुतनीकरण, नोंदणी प्रमाणपत्राची आवेदने प्रलंबित असल्याबाबत

**(२९) ९०६७ (२०-०७-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील क्षेत्रिय परिवहन कार्यालयात परवान्याचे नुतनीकरण, नोंदणी प्रमाणपत्राची हजारो आवेदने प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन नुतनीकरण प्रक्रिया सुरु असताना देखील परवान्याचे नुतनीकरण व नोंदणी प्रमाणपत्राकरीता नऊ महिन्यांचा कालावधी लागत असून क्षेत्रिय परिवहन कार्यालयातील पद रिक्त असल्याचे कारण सांगून कामे प्रलंबित ठेवली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथील क्षेत्रिय परिवहन कार्यालयातील सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दिनांक ०१/०४/२०२० ते दिनांक ०१/०१/२०२१ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर शहर व ग्रामीण व पूर्व या कार्यालयांद्वारे १८२७० इतक्या वाहनांच्या परवान्यांचे नूतनीकरण व ९२७३६ इतक्या वाहनांच्या नोंदणीचे प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहे.

संबंधित कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपवून त्यांच्याकडून सर्व कामे पूर्ण करुन घेण्यात येतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई ते बडोदा राष्ट्रीय महामार्गासाठी पनवेल व कर्जत (जि.रायगड) तालुक्यात भूसंपादित झालेल्या शेतकऱ्यांची आर्थिक फसवणुक झाल्याबाबत

**(३०) ९०७८ (१४-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते बडोदा या राष्ट्रीय महामार्गासाठी पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील गावांमधील भूसंपादनाची अधिसूचना निघाल्यानंतर भूसंपादनाचा नकाशा आणि मार्ग शासकीय अधिकाऱ्यांना ज्ञात होत असल्याने सदर अधिकाऱ्यांनी ही माहिती दलालांपर्यंत पोहोचविली असून पनवेल तालुक्यातील गावात राबविलेल्या भूसंपादन प्रक्रियेतून स्थानिक आदिवासींकडून दलालांनी त्या-त्या पट्ट्यातील जमिनी रुपये ९० हजार ते रुपये एक लाख गुंठा या दराने खरेदी केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षानुवर्षे विनावापर पडून असलेल्या जमिनींची दलालामार्फत रोख रक्कम देवून खरेदी करीत असल्याने शेतकऱ्यांनी जमीन खरेदी-विक्री व्यवहार सुरु केले, कर्जत (जि.रायगड) आदिवासी समाजाच्या लोभीवाडीत राहणारे अरुण लोभी यांची माहे ऑगस्ट, २०२० मध्ये दलालांनी ६४ गुंठे जमीन रुपये २३ लाखांना खरेदी केली आणि दलालांना पुढील तीन महिन्यात सुमारे दोन कोटी रूपयांची नुकसान भरपाई मिळाली, याच जमिनींना चार ते पाच लाख रुपये गुंठा या दराने शासनाने मोबदला दिल्याचे निदर्शनास आल्यानंतर शेतकऱ्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले, भूसंपादन अधिसूचनेनंतरच्या या खरेदी व्यवहारांना बेकायदा ठरवण्याऐवजी रायगड जिल्हाधिकारी कार्यालय आणि पनवेल प्रांत कार्यालयाने आदिवासींच्या जमिनी खरेदी केलेल्यांना पाचपट मोबदल्याचे धनादेशही दिले असल्याचे निदर्शनास आले असून लॉकडाऊनच्या काळातही हे सर्व व्यवहार सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारात फसवणूक झालेल्या पनवेल व कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांनी संबंधित दलाल, शासकीय अधिकारी यांचेवर कारवाई करुन भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पनवेल व कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) अशी बाब नाही.
(४) नियमाप्रमाणे मोबदला वाटप करण्यात आलेला आहे.
(५) अशी बाब नाही.

---

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील चित्रपटसृष्टीला सवलती देण्याबाबत

**(३१) ९०९१ (१५-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनामुळे चित्रपट व टी.व्ही. सिरीयल इत्यादींचे सर्व चित्रीकरण बंद ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या व्यवसायात गुंतवला गेलेला पैसा व त्यातून होणारा तोटा लक्षात घेता शासनाने चित्रपटसृष्टीला काही सवलती द्याव्यात अशी मागणी काही संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन चित्रपटसृष्टीला सवलती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०३-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १५/०४/२०२१ ते दिनांक ०६/०६/२०२१ या कालावधीत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन जाहीर केला होता.

(२) होय, चित्रीकरण स्थळाच्या भाड्यामध्ये सवलत देण्यात याव्यात अशी मागणी संघटनेकडून होत आहे.

(३) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे निर्मिती संस्थांना लॉकडाऊन कालावधीत देयकाच्या रकमेच्या ४०% सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या दिनांक २८/०९/२०२१ च्या १५८ व्या बैठकीमध्ये ठराव मान्य झाला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरोनो कालावधीत बँकेकडून कर्जाच्या थकबाकीमध्ये सवलत मिळण्याबाबत

**(३२) ९१०२ (१०-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात अनेक बँक कर्जदारांना कर्ज फेडता न आल्यामुळे त्यांच्या कर्जाच्या थकबाकीमध्ये वाढ होऊन बँक कर्जदार आर्थिक अडचणीत आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेकडून कर्जाच्या थकबाकीमध्ये सवलत देण्याबाबत मागणी बँक कर्जदारांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी आढावा घेऊन कर्जदारांना थकबाकीमधील कर्ज फेडण्यामध्ये सवलत देण्यासाठी शासनाने बँकांना आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-१२-२०२१) :** (१), (२) व (३) माहे एप्रिल व मे, २०२१ मध्ये उद्भवलेल्या कोविड-१९ परिस्थितीमुळे लागू केलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत शेतकऱ्यांना शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत निर्माण झालेल्या अडीअडचणी व अन्य बाबी विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक ०१/०७/२०२१ अन्वये सन २०२०-२१ या वर्षात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व व्यापारी बँका कडून दिलेल्या पीक कर्जाच्या वसूली दिनांक ३१/०७/२०२१ पर्यंत मुदतवाढ दिली.

तसेच नागरी सहकारी बँका कडील कर्जदारांची अडचण विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १३/०८/२०२१ अन्वये नागरी सहकारी बँकांकडील एकरकमी कर्ज परतफेड योजनेस दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. यामुळे नव्याने थकीत झालेल्या नागरी सहकारी बँकेच्या कर्जदारांना सुद्धा या योजनेचा लाभ घेणे शक्य होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील मग्रारोहयो योजनेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे थकित वेतन अदा करण्याबाबत

**(३३) ९१७१ (१५-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील मग्रारोहयो योजनेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी ते माहे एप्रिल या ४ महिन्यांचे वेतन मिळाले नसल्याचे तसेच मग्रारोहयो योजनेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामाचे पुढील आदेश देखील देण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत ठेवणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांना अदा करणे व पुढील कामाचे आदेश देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०१-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहेत.

नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मग्रारोहयो योजनेंतर्गत काम करणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन हे सीएससी एसव्हीपी या केंद्रीभूत संस्थेव्दारे प्रदान करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने, जुन्या संस्थेचा सेवाकरार संपुष्टात आणून नव्या संस्थेमार्फत नियुक्ती आदेश देण्यास काही तांत्रिक कारणास्तव (भनिनी, ईएसआयसी, विमा कवच) विलंब झाला होता. तथापि, आज रोजी सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

तद्नंतर उपरोक्त सर्व बाबींची पूर्तता करुन सदर कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी ते एप्रिल २०२० या चार महिन्याचे मानधन हे माहे मे व जून-२०२० मध्ये प्रदान करण्यात आले आहे व सदय:स्थितीत ते विहीत वेळेत अदा करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) ९२५४ (१४-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तालुका पातळीवर क्रीडा संकुल उभारण्याबाबतचा निर्णय मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी मागील वर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने १०० तालुका क्रीडा अधिकारी पदांना मंजूरी दिली असून त्यापैकी ५० पदे सरळसेवांतर्गत पध्दतीने तर ५० पदे पदोन्नती माध्यमातून भरण्यात येणार असतानाही शासनाने केवळ ३५ टक्केच पदे भरली असून उर्वरित ६५ टक्के पदे अद्याप भरण्यात आली नसल्याचे दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण भागातील व गरीब होतकरु तरुणांना क्रीडा कौशल्य शिक्षण मिळण्याच्यादृष्टीने तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची मंजूर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०३-१२-२०२१)** : (१) होय.
(२) अंशतः खरे आहे.

तालुका क्रीडा अधिकाऱ्यांच्या १०० पदांपैकी ४३ पदे रिक्त आहेत.

(३) तालुका क्रीडा अधिकारी संवर्गातील सरळसेवेची १५ पदे भरण्यास मान्यता मिळाली असून या पदांसाठी मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेत दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीचे समन्यायी वाटप करण्याबाबत

**(३५) ९३६३ (१५-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा परिषदेत दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीचे जिल्हा परिषद सदस्यांना कमी-जास्त प्रमाणात वाटप होत असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निधीचा धनादेश (चेक) सदस्यांमध्ये समन्यायी वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (३०-११-२०२१)** : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावांचा दर्जा देण्याबाबत

**(३६) ९४४४ (१४-०६-२०२१) श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ७४२७ ला दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावाचा दर्जा नसल्यामुळे या तांड्यांना रस्ते, पाणीपुरवठा, वीज इत्यादी मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांड्यांना (बंजारा वस्ती) महसूली दर्जा देण्याबाबत शासनामार्फत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावाचा दर्जा देण्याबाबत शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ पोट-कलम (१) खंड (सहा) मध्ये ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या/तांडे/वस्त्या यांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देण्याबाबत तरतूद आहे. त्याबाबतचे शासनाचे अधिकार शासन अधिसूचना क्र. टिएलसी/१०७६/६३९२३/म-६, दिनांक ०१/०७/१९७६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी यांचे स्तरावर प्राप्त प्रस्तावांवर नियमोचित कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील बहुतांश ठिकाणी बंजारा समाजाच्या पात्र तांड्यांना महसुली गावाचा दर्जा देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच नाशिक विभागात ९, औरंगाबाद विभागात ८ व नागपूर विभागात ४ बंजारा समाजाच्या पात्र तांड्यांना स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत अतिरिक्त वीज अणणाऱ्या पारेषण वाहिन्यांच्या उभारणीचे काम शीघ्र गतीने होण्याबाबत

**(३७) ९६०० (१४-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पॉवर ग्रीडमध्ये व्यत्यय आल्यानंतर मुंबईचा वीज पुरवठा अबाधित राहण्यासाठी सन १९८१ पासून मुंबई आयलँडची सुविधा उपलब्ध असतानाही वीज आणणाऱ्या वाहिन्यांवर भार येऊन दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास सदरहू सुविधा कार्यान्वित न झाल्याने अवघ्या २० मिनिटात संपूर्ण मुंबईची वीज गेली होती व ती पूर्ववत होण्यास किमान आठ ते दहा तासांचा अवधी लागला होता याप्रकरणी तांत्रिक लेखापरीक्षण करण्यासाठी शासनाने मुंबई आयआयटीचे विद्युत अभियांत्रिकी शाखेचे विभाग प्रमुख श्री.बी.जी. फर्नांडीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामत: रेल्वेसह मुंबईतील जनजीवन पूर्णत: ठप्प झाले असल्याने या घटनेचा तपास करण्यासाठी आयोगाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने संबंधित सर्व कंपन्या तसेच ऊर्जा विभागांशी चर्चा करून अहवाल वीज नियामक मंडळ आयोगाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत सुमारे १ हजार मेगावॅट अतिरिक्त वीज आणण्यासाठी खारघर-विक्रोळी पारेषण वाहिनीला सन २०११ मध्येच मंजूरी देण्यात येऊन ती सन २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु उक्त कामाला सन २०१८-२०१९ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली असतानाही अद्यापही काम प्रलंबित असल्याची बाब चिंताजनक असल्याचे मत महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मांडले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू समितीने अहवालात केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच सदरहू समितीने सादर केलेल्या शिफारशींपैकी कोणकोणत्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या असून त्यांच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मुंबईत अतिरिक्त वीज आणणाऱ्या पारेषण वाहिन्यांच्या उभारणीस विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, सदरहू अतिरिक्त वीज आणणाऱ्या पारेषण वाहिन्यांच्या उभारणीचे काम शीघ्र गतीने हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१८-११-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

श्री.बी.जी.फर्नांडिस विभागप्रमुख, विद्युत अभियांत्रिकी शाखा, आयआयटी, पवई, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सुधारणात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक २२/१०/२०२० रोजी उच्चस्तरीय समितीची स्थापना केली.

(४) शहर व उपनगरीय क्षेत्रात दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या खंडित घटनेबाबत राज्य शासनाने गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक समितीने उपकरण देखभाल, स्थिती देखरेख, ग्रिड ऑपरेशन्स, आणीबाणी नियंत्रण, प्रणाली नियोजन, सरंक्षण आणि नियंत्रण प्रणाली, सिस्टम रिस्टोरेशन, प्रशिक्षण इत्यादीच्या अनुषंगाने पारेषण वाहिन्यांचे नियोजन, देखभाल, दुरुस्ती, आऊटेज, समन्वय अद्ययावत करण्याच्या संदर्भातील आहेत. उक्त शिफारशींच्या अनुषंगाने अमंलबजावणीची कार्यवाही करण्यात आली/येत आहे. उक्त समितीचा अहवाल व त्यावरील शिफारशी व त्या शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल (Action Taken Report) याबाबतचे सादरीकरण दिनांक २७/१०/२०२१ रोजी मंत्रीमडळासमोर सादर करण्यात आले. मंत्रिमंडळाने उक्त समितीचा अहवाल व त्यातील शिफारशी व त्यावरील कृती अहवालाची नोंद घेतली.

(५) व (६) मुंबईत अतिरीक्त वीज आणणाऱ्या पारेषण वाहिन्या व अंडर ग्राऊंड केबल यांची वहिवाट घनदाट लोकवस्ती, रस्ते व रेल्वे मार्ग तसेच बेकायदेशीर झोपडी क्षेत्र अशा मार्गातून जात असून वाहिन्यांचे काम करण्याकरीता संबंधित क्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी, जनतेचा विरोध व कोर्टातील प्रलंबित प्रकरणे यामुळे पारेषण वाहिन्यांच्या उभारणीच्या कामास विलंब होतो.

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने दिनांक २९/०३/२०१९ रोजी प्रकरण क्र.०३/२०१९ मध्ये दिलेल्या आदेशानुसार पारेषण वाहिन्यांचे काम लवकरात लवकर करण्यासाठी प्रधान मुख्य अभियंता (Principal Chief Engineer) केंद्रीय विद्युत प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली असून सदर समिती पारेषण वाहिन्यांच्या कामांच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेते. शिवाय महापारेषणतर्फे विविध शासकीय विभागांमध्ये सतत पाठपुरवठा घेण्यात येतो जेणेकरुन पारेषण वाहिनींची कामे लवकर पूर्ण होण्यास मदत होते.

---

## अजनुप (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भाकरीपाडा (उठावा) या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३८) ९६८५ (१७-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत अजनुप (ता.शहापूर, जि.ठाणे) परिसरातील दहा आदिवासी पाड्यांना जोडणारा भाकरीपाडा (उठावा) या रस्त्याच्या कामास मा.तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी मंजुरी दिल्यानंतर सदर कामास सुरुवात करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामास सुरुवात केल्यानंतर अवघ्या १५ दिवसात काम बंद करण्यात येऊन दोन वर्षे चार महिने इतका कालावधी होऊनही रस्त्याचे काम अद्याप सुरु करण्यात आले नसल्याचे दिनांक २९ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम सहा महिन्यात पूर्ण करणे अपेक्षित असतानाही काम पूर्ण केले नसून कंत्राटदाराने करारनाम्याचा भंग केला असून त्याबाबत दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द व कंत्राटदाराविरुध्द शासनाने कारवाई करुन सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर रस्त्याच्या कामास कार्यकारी अभियंता स्तरावर व अधीक्षक अभियंता स्तरावर मुदतवाढ दिल्यानंतर ठेकेदाराने सदरचे काम दिनांक २६ डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतु, वाढीव मुदतीत ठेकेदाराकडून काम पूर्ण न झाल्यामुळे दिनांक २६ डिसेंबर, २०१९ पासून शिल्लक स्विकृत निविदा रकमेच्या १% प्रती आठवडा दंड आकारण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर रस्त्याची उर्वरित कामे ही कारपेट व सीलकोट ची असल्याने पावसाळा संपल्यानंतर काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

## मुंबईतील सागरी सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(३९) ९७८४ (२२-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर सागरी सुरक्षेबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी माजी केंद्रीय गृह सचिव श्री.राम प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती व सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला असून त्यात महत्त्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवाल केव्हा प्राप्त झाला आहे, त्यातील शिफारशींचे स्वरुप काय आहे, यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (३०-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) श्री.राम प्रधान समितीने आपला अहवाल दिनांक २७/०५/२००९ रोजी शासनास सादर केला. या अहवालातील शिफारशीपैकी सागरी सुरक्षेशी संबंधित शिफारशी संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

गृह विभाग, शासन निर्णय दिनांक १८ फेब्रुवारी, २०१० अन्वये सागरी किनारा सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी तटरक्षक दलाकडून तयार करण्यात आलेले (Standard operating Procedures) मध्ये नमूद केल्यानुसार सागरी सुरक्षेसाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

राज्यातील समुद्रकिनारा लगतच्या गावांमध्ये सागरी सुरक्षेकरीता एकूण ५०६ सागर रक्षक दलांची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये एकूण ५९७० रक्षक कार्यरत आहेत.

कृषी व पदूम विभाग, शासन निर्णय दिनांक ३०/०७/२०१५ अन्वये मत्स्यव्यवसाय विभागामार्फत संवेदनशिल लँडींग पॉईट्सवर फिशीग वॉर्डन्सची नेमणूक करण्यात आलेली असून सदर लँडींग पॉईट्सवर मासेमारी बोटींसाठी टोकन सिस्टिम सुरु करण्यात आलेली आहे.

तटीय सुरक्षेकरीता राज्य शासनाने अतिवेगवान बोटी वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्याकरीता बोटी भाड्याने घेण्यात आलेल्या आहेत. पोलीस जवानांना प्रशिक्षण देण्यात आले असून, सुरक्षा पोलीस स्थानके सुरु करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण थांबवण्याबाबत

**(४०) ९८४१ (१७-०६-२०२१) श्री.सुरेश धस : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ५४६९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) तालुक्यातील आदिवासींच्या जमिनी बेकायदेशीरपणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३६ व ३६अ चे उल्लंघन करुन जनजाती तर अन्य व्यक्तींकडे हस्तांतरित झाल्याची दहा प्रकरणे आढळून आली होती तसेच नव्याने आणखी तीन प्रकरणे आढळून आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील १३ प्रकरणामध्ये अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसून सदर जमिनी आदिवासींना परत करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लिंबागणेश (ता.जि.बीड) येथील आदिवासींची जमीन गट नंबर ३०५, ३०६, ३०७ व ३०८ जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय व शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय बिगर आदिवासीं व्यक्तींकडे हस्तांतरित झालेली असल्याने याप्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांनी नियमानुसार स्वाधिकारे कारवाई करण्यासाठी दिनांक २ नोव्हेंबर, २०२० रोजी अर्जाव्दारे मागणी करुनही अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम १९७४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता महसूल अधिनियम १९६६ कलम ३६ व ३६अ नुसार कार्यवाही करुन त्या जमिनी आदिवासींना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्राप्त माहिती नुसार १३ प्रकरणांत सर्व ७/१२ वर “हस्तांतरणांस बंदी” असा शेरा मारण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली असून सदर जमीनी प्रत्यापर्णाबाबतची कार्यवाही सुरु करणेबाबत जिल्हाधिकारी, बीड यांचेस्तरावरुन संबंधित तहसिलदार, आष्टी व बीड यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परिवहन विभागातील अधिकारी व अन्य संबंधीतांनी जप्त केलेल्या वाहनांची परस्पर विक्री केल्याबाबत

**(४१) ९८५२ (१५-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील परिवहन विभागातील अधिकारी व अन्य संबंधितांनी कर्जाचे हप्ते थकल्याने जप्त केलेल्या कारची परस्पर विक्री केल्याचा प्रकार माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन आरटीओ अधिकाऱ्यांसह कोटक महिंद्रा प्रा.लि. व रिलायन्स जनरल इन्शुरन्स ठाणे शाखेचे अधिकारी अशा १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयास सादर करण्यात आलेल्या वाहनाच्या कागदपत्रांच्या आधारे सदर वाहनावरील कर्जबोजा उतरवून, त्यास दिनांक ०६/०९/२०१८ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या कार्यालयासाठी जारी केले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) होय, उपरोक्त प्रकरणात सीबीडी पोलीस ठाणे, बेलापूर येथे तपास चालू आहे.

---

## मौजे सांगरुण (ता.हवेली, जि.पुणे) येथील नदीपात्रावर पादचारी पुलाऐवजी साकव पुल बांधणेबाबत

**(४२) ९९०८ (१५-०७-२०२१) श्री.अनिकेत तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७९३१ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सांगरुण (ता.हवेली, जि.पुणे) व मौजे सोनापूर ही गावे मुळा-मुठा नदीच्या जलाशयामधून १.०० कि.मी अंतरावर असून नदीपात्रातून एकेरी पूल बांधकामास रुपये ६० कोटी तर दुहेरी पुल बांधकामास रुपये १५० कोटी इतका खर्च येणार असून जिल्हा परिषदेकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी जलाशयातील १.०० कि.मी. अंतर असताना त्या अंतरासाठी नागरिकांनी अपस्ट्रीम बाजुकडील नदी पात्रातुन वाहतूक सुविधा नसल्यामुळे ६.०० कि.मी. अंतर व डाऊनस्ट्रीम बाजुस १०.०० कि.मी. अंतरावरील डांबरी रस्त्यावर पोहचणे धोक्याचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेस सिमेंट बांधकामाचे एकेरी वा दुहेरी पुल बांधणे निधी अभावी शक्य नसल्यास त्याऐवजी नदीपात्रावर साकव पूल बांधण्यात यावा अशी तेथील ग्रामस्थांनी प्रथम दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी व त्यानंतर दिनांक २१ मे, २०२१ रोजी मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

अपस्ट्रीम बाजूकडील रस्ता रा.मा. ११५ दर्जाचा व डाउनस्ट्रीम बाजूकडील रस्ता प्रजिमा-३७ दर्जाचा असून सदर रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागाची रुंदी ५.५० मी. आहे. सदर दोन्ही रस्ते वाहतूक वर्दळीस सुस्थितीत आहेत.
(३) मागणी केली, हे खरे आहे.
(४) साकव कार्यक्रमांतर्गत रुपये ३५.०० लक्ष मर्यादेपर्यंत अंदाजित किंमतीच्या साकवांना जिल्हा नियोजन समितीमधून मंजूरी देण्यात येते. सदर ठिकाणी खडकवासला धरणाचा जलाशय असल्याने साधारणात: १.०० कि.मी. लांबीचा पुल बांधणे आवश्यक राहील. त्यामुळे सदर ठिकाणी साकव पुल बांधणे शक्य होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.वरवडे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्याबाबत

**(४३) ९९०९ (१५-०७-२०२१) श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.वरवडे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील वरवडे प्राथमिक आरोग्य केंद्र ते परबवाडी गवळदेवपर्यंतच्या १ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम ग्रामस्थांचे श्रमदान व रोजगार हमी योजनेंतर्गत तत्कालीन मा.खासदार निधीतून सन २००२ मध्ये पूर्ण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या १८-१९ वर्षात सदर रस्त्याची दुरुस्ती, खडीकरण, डांबरीकरण रस्त्यात येणाऱ्या मोऱ्या व साईडपट्टयाचे काम न केल्यामुळे तसेच सदर रस्ता शेतकऱ्यांच्या शेतातून जात असल्यामुळे शेतीचे दरवर्षी नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-२०१५ मध्ये पुरहानी कार्यक्रमांतर्गत १ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी २१० मीटर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम झाले असून उर्वरित लांबीमधील पृष्ठभाग नादुरुस्त असल्याने डांबरीकरण करणे, रस्त्यात येणाऱ्या मोऱ्या व साईडपट्टयांचे काम तसेच संरक्षक भिंत बांधणे आवश्यक असल्याचे तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार रस्त्याचे काम करणे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याच्या नादुरुस्त झालेल्या पृष्ठभागाचे डांबरीकरण व संरक्षक भिंत बांधण्याबाबत तसेच जिल्हा परिषद निधीची अडचण लक्षात घेता सदर रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेमधून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ मध्ये पूरहानी कार्यक्रमांतर्गत २१० मीटरचे डांबरीकरणाचे काम झालेले असून सदर लांबी सुस्थितीत आहे.

(३) व (४) सा.क्र. ०/२३० ते ०/४४० मध्ये सन २०१४-१५ मध्ये पूरहानी कार्यक्रमांतर्गत डांबरी नुतनीकरणाचे काम झालेले असून रस्त्याचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे. तसेच सा.क्र. ०/६०० ते ०/७०० मधील पृष्ठभाग सुस्थितीत आहे. रस्त्याच्या उर्वरित लांबीमधील पृष्ठभाग नादुरूस्त असल्याने डांबरी नुतनीकरण करणे व संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे.

सदर रस्ता सुस्थितीत करावयाचा झाल्यास सुमारे रुपये ३३.८० लक्ष इतका निधी अपेक्षित आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकरीता मा.मंत्रीमंडळाने सन २०१५-१६ ते २०१९-२० या ५ वर्षांकरीता निश्चित केलेले उद्दिष्टानुसार, आतापर्यंत पूर्ण लांबीस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असून सद्य:स्थितीत सदर योजनेचे उद्दिष्ट संपुष्टात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील साखर कामगारांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत

**(४४) १०२३५ (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर हंगाम अंतिम टप्प्यात आला असला तरी साखर कामगाराचा वेतन करार झाला नसल्यामुळे शेकडो कोटी रूपयांचे वेतन कारखाना प्रशासनाकडे थकीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून साखर कारखान्यांनी कामगारांच्या वेतनातून कपात करण्यात आलेले फंड, विमा, कामगार पतपेढी, पतसंस्था सोसायटी व इतर वेतनातील रक्कम संबंधित कामगारांना अदा केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०१९ ला वेतनकराराची मुदत संपली असून मागील दोन वर्षापासूनचे थकीत वेतन करार करून अदा करण्याबाबतच्या मागणीबाबत संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर त्रिपक्ष समिती स्थापन करण्यात आली मात्र या समितीच्या तीन बैठका होऊनही कोणताच समाधानकारक निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामगारांचे मागील दोन वर्षांपासूनचे थकीत वेतन तात्काळ करार करून उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही गेली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील साखर कारखान्यातील कामगारांच्या वेतनाबाबत करावयाच्या करारास दिनांक २९/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

राज्यातील साखर कारखान्यातील कामगारांच्या वेतनाबाबत करावयाच्या करारास दिनांक २९/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोवर्धन (ता.जि.नाशिक) येथील दगड खाणीसाठी राखीव असलेली जागा मुंबई एज्युकेशन ट्रस्टकडून परत घेण्याबाबत

**(४५) २२५९३ (२०-०४-२०१७) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोवर्धन(ता.जि.नाशिक) येथील शासनाने दगड खाणीसाठी राखीव ठेवलेले तब्बल रुपये १२ कोटीचे ९ हेक्टर १३ आर इतके आरक्षित क्षेत्र मुंबई एज्युकेशन ट्रस्टला रुपये ९ लाख ८ हजार २२५ रूपयात देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दगड खाणीसाठी राखीव ठेवलेले क्षेत्र मुंबई एज्युकेशन ट्रस्टला देताना संस्थेने २ वर्षांच्या आत (२०११-२०१२) या वर्षी सदर जागेवर बांधकाम करून ज्या प्रयोजनासाठी जागा देण्यात आली आहे त्यासाठी वापर करावा असे म्हटलेले असतानाही जागा वर्ग केल्यानंतर माहे जून, २०१५

पर्यंत या जागेवर संरक्षण भिंत उभारण्याखेरीस कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यात आले नसल्यामुळे शासनाने घातलेल्या अटी व शर्तीचा भंग झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सदरहू जागेच्या स्थळ निरीक्षणाच्या अहवालाची मागणी केल्यानुसार जिल्हा प्रशासनाने महसूल व वन विभागाच्या अप्पर मुख्य सचिव कार्यालयास सन २०१२ मध्ये अहवाल सादर करत संबंधित जागा मुंबई एज्युकेशन ट्रस्टला वर्ग करताना संस्थेला 'अनडयू फेवर' करण्यात आल्याचे सांगून संस्थेने जागा घेतल्यापासून २ वर्षात जागेचा वापर केला नसल्यामुळे जागा वाटप आदेशातील अटी व शर्तीचा भंग झाला असून सदर जागा परत घेण्यात यावी असे म्हटले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई एज्युकेशन ट्रस्टकडून संबंधित जागा परत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०२-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

शासन ज्ञापन क्र.जमीन ३०/२०००/प्र.क्र.२०८/ज-६, दिनांक ०६/११/२००३ नुसार मौजे गोवर्धन ता.जि.नाशिक येथील गट क्र.३२ मधील ४.१३ हे.आर क्षेत्र शासन परिपत्रक दिनांक ०८/०२/१९८३ व शासन निर्णय दिनांक ३०/०६/१९९२ मधील तरतुदीनुसार रुपये १,५४,८७५/- एवढी कब्जेहक्काची रक्कम आकारुन मुंबई एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेस अभियांत्रिकी /तांत्रिक पदवी/पदविका शिक्षणाचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मंजूर केलेली आहे. तसेच शासन ज्ञापन क्र.जमीन ३०/२००८/प्र.क्र.४८/ज-६, दिनांक ०७/०१/२००९ अन्वये मौजे गोवर्धन ता.जि.नाशिक येथील गट क्र.३२ मधील ५.०० हे.आर क्षेत्र शासन परिपत्रक दिनांक ०८/०२/१९८३ व शासन निर्णय दिनांक ३०/०६/१९९२ मधील तरतुदीनुसार रुपये ३०,१३,०००/- एवढी कब्जेहक्काची रक्कम आकारुन मुंबई एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेस अभियांत्रिकी /तांत्रिक पदवी-पदविका शिक्षणाच्या विस्तारीकरणासाठी मंजूर केलेली आहे.

वरील जमीन पुर्वी सार्व. बांधकाम विभागाकडे वर्ग होती व सदर जमीन महसूल विभागास प्रत्यार्पित केल्यानंतर विहीत प्रक्रियेअंती संस्थेस प्रदान करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) मा.महालेखापाल कार्यालय, मुंबई यांनी सन २०१०-२०११ चा महसूल जमा अहवाल परिच्छेद क्र.०४.३.०८.२ मध्ये जमिनीच्या शर्तभंगाबाबत आक्षेप घेण्यात आला होता. मुंबई एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेने केवळ जागेस कंपाऊंड व वॉचमनचे शेड केलेले असल्यामुळे जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १०/०९/२०१२ रोजीच्या पत्रानुसार शर्तभंगाचा अहवाल शासनास मान्यतेसाठी सादर केला. प्रकरणी अर्जदार संस्थेने मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे विनंती अर्ज केल्यानुसार मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक ०५/१०/२०१५ व ०२/१२/२०१५ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सदर सुनावणीच्या अनुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक ३०/०५/२०१६ रोजी आदेश पारित केलेत. सदर आदेशानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सादर केलेला शर्तभंग प्रस्ताव मंजूर केलेला असून संस्थेस जमीन मंजूर करण्यात आलेले शासन ज्ञापन दिनांक ०६/११/२००३ व ज्ञापन दिनांक ०७/०१/२००९ रद्द करण्यात आलेले असून दावा मिळकत शासन जमा करणेबाबत आदेश पारित केले आहे.

मा.मंत्री (महसूल) यांनी पारित केलेले दिनांक ३०/०५/२०१६ रोजीचे आदेशाविरुध्द मुंबई एज्युकेशन ट्रस्ट यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांच्या न्यायालयात रिट याचिका (एल) क्र.१५७०/२०१६ दाखल केली होती. सदर रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२/०८/२०१६ रोजी आदेश पारित केलेले असून मा.मंत्री (महसूल) यांचे दिनांक ३०/०५/२०१६ रोजीचे आदेश रद्दबादल ठरवून अर्जदार संस्थेस जागेचा पुर्ववत कब्जा देणेबाबत आदेशित केलेले आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक (एल) क्र.१५७०/२०१६ मध्ये दिलेल्या दिनांक १२/०८/२०१६ रोजीच्या आदेशाविरुध्द शासनामार्फत मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे Special Leave to Appeal (C) No.(S) २८८७०/२०१६ दाखल करण्यात आली. सदर Special

Leave to Appeal (C) No.(S) २८८७०/२०१६ या याचिकेच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३०/०९/२०१६ रोजीच्या आदेशानुसार आदेश पारित केलेले असून स्पेशल लिव्ह पिटीशन (Dismiss) काढुन टाकले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे चळे पाटी ते ग्रामपंचायत कार्यालय (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४६) ३७६९८ (०४-०४-२०१८) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चळे पाटी ते ग्रामपंचायत कार्यालय (ता.पंढरपूर, जि सोलापूर) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे स्थानिकांची गैरसाय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्त करणेबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनास वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) मौजे तारापूर चळे ते प्रजिमा.७० ला जोडणारा रस्ता इतर जिल्हा मार्ग ६१ असून सदर रस्त्याच्या सा.क्र.१०/०० ते १५/०० मध्ये मौजे चळेपाटी ते ग्रामपंचायत कार्यालय हा भाग समाविष्ट आहे. सदर लांबीपैकी १०/०० ते १२/५०० या लांबीमध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्राप्त निधीमधून दुरुस्ती करण्यात आली आहे. उर्वरीत १२/५०० ते १५/०० लांबीतील रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असून निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरीत रस्त्याची दुरुस्ती करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षणाची दर्जा स्पष्ट करणारी श्वेतपत्रिका काढण्याबाबत

**(४७) ४७०२८ (०५-०७-२०१९) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ. सुधीर तांबे, डॉ. वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण हे चौथ्या श्रेणीचे असल्याचे मानव संसाधन विकास विभागाने जाहीर केलेल्या निर्देशकानुसार स्पष्ट झाल्याचे दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राच्या नावाखाली जो शिक्षणाचा दर्जा देण्याचे सांगितले जात आहे त्याला छेद देणारा हा अहवाल आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षणाचा दर्जा स्पष्ट करणारी श्वेतपत्रिका काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड (०३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीमार्फत खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांना विकास कामासाठी निधी देण्याबाबत

**(४८) ४७४३० (०५-०७-२०१९) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीमार्फत चौदाव्या वित्त आयोगातून जिल्हा परिषदेच्या शाळांना विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जात असून खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना विकास कामासाठी निधी दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतीमार्फत चौदाव्या वित्त आयोगातून खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांना विकास कामासाठी निधी देण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने ग्रामपंचायतीमार्फत चौदाव्या वित्त आयोगातून खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांना विकास कामासाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अपंग कल्याण धोरण जाहीर करण्याबाबत

**(४९) ४७८२५ (०६-०७-२०१९) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपंग कल्याण धोरण त्वरीत जाहीर करावे तसेच अपंगांच्या इतर मागण्यांबाबत राष्ट्रीय अपंग विकास महासंघ, महाराष्ट्र राज्य यांनी शासनाकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अपंग कल्याण धोरण केव्हा जाहीर करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (३०-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक २०/०२/२०१९ अन्वये दिव्यांग व्यक्तीसाठी महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण २०१८ ची अंमलबजावणी करणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील प्रदूषण रोखण्याबाबत

**(५०) ४९३३८ (२९-०८-२०१९) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६१८ ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिक प्रदूषणामुळे येथील कारखान्यांचा प्रदूषण निर्देशांक ६० टक्क्यांपेक्षा अधिक असल्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून त्यांची वर्गवारी 'अतिप्रदूषित' वर्गात केली असून अशा कारखान्यांना 'लाल' रंगाची ओळख दिली असल्याचे दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे-पालघरमध्ये सद्य:स्थितीत ४ हजार ७५० अतिप्रदूषित कारखान्यांची नोंद करण्यात आली असून प्रदूषणकारी कारखान्यांच्या संख्येमध्ये पुण्यानंतर ठाणे-पालघर जिल्ह्याचा दुसरा क्रमांक लागत असल्याचे राज्याच्या सन २०१८-१९ च्या आर्थिक पाहणी अहवालातूनही स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर औद्योगिक प्रदुषणाचा दुष्परिणाम होत असल्याने येथील कारखान्यांतून दिवसेंदिवस वाढत असलेल्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०६-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रदूषण निर्देशांक ६० टक्क्यांपेक्षा अधिक असलेल्या उद्योगांचे वर्गीकरण लाल प्रवर्गात केले जाते.

मा.राष्ट्रीय हरित लवादाने मूळ अर्ज क्र.१०३८/२०१८ मध्ये दिलेल्या विविध आदेशांच्या अनुषंगाने कैंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या व्यापक पर्यावरण प्रदूषण निर्देशांकामध्ये तारापूर औद्योगिक वसाहत ९३.६९ गुणाकांसह प्रथमस्थानी आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांनी बसविलेल्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची वेळोवेळी पाहणी केली जाते. पाहणीवेळी दोषी आढळलेल्या उद्योगांवर कारवाई केली जाते. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून राष्ट्रीय हवा सनियंत्रण कार्यक्रमातंर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रांच्या परिसरातील हवा गुणवत्तेची तपासणी करण्यात येते. या परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अविरत हवा गुणवत्ता मोजमाप संयंत्रणा उभारण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.